Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 269 – 274
DOI: 10.5281/zenodo.10121955

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक, ग्राम स्वराज्य, धर्म व राजकारण विषयक विचार

प्रा. डॉ. संदीप भागू चपटे

शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे ता. मुरबाड जि. ठाणे ४२१४०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sandipchapte21@gmail.com

Received: 16 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रास्ताविक

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख तत्त्वज्ञ म्हणजे महात्मा गांधी हे होय. संपूर्ण जगाला अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी प्रेरित केले. रवींद्रनाथ टागोर यांनी प्रथम त्यांना 'महात्मा' ही उपाधी दिली.भारतातील लोक प्रेमाने त्यांना 'बापू' असे म्हणत. स्वतंत्र भारताचे 'राष्ट्रपिता' म्हणून महात्मा गांधीजींना ओळखले जाते. ते सत्याग्रहाचे जनक व अहिंसेचे पुजारी म्हणून संपूर्ण जगात ओळखले जातात. त्यांची जयंती जगभरात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरी केली जाते. गांधीजींचे तत्त्वज्ञान केवळ पुस्तकी नसून पुढील पिढ्यांना त्याचा उपयोग होणार आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महात्मा गांधीजी यांचे योगदान मोठे आहे. अहिंसा, सत्य यांना विचाराचे मूलभूत तत्व गांधीजींनी मानले. सत्य हे त्यांच्या जीवनाचे साध्य होते. तर अहिंसा हे सत्यापर्यंत पोहोचवण्याचे साधन होते. म्हणून त्यांनी अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रहाचा लढा दिला. महात्मा गांधींनी देशातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय आदी प्रश्नांचा विचार केला.

## जीवन परिचय

एक अध्यात्मवादी व आदर्शवादी पुरुष म्हणजे महात्मा गांधी होय.ते मानवतावादी होते.राजकारण आणि धर्म यांचे सुंदर मिश्रण म्हणजे महात्मा गांधी होय. व्यवहारीक राजकारणाला एक नवी दृष्टी महात्मा गांधी यांनी दिली. मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १९६९ रोजी पोरबंदर येथे झाला. आई-वडिलांच्या धार्मिक विचारांचा प्रभाव महात्मा गांधीजींवर पडला होता. गांधीजींचे प्राथमिक शिक्षण राजकोट येथे झाले. १८८७ मध्ये मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण

झाल्यानंतर ते इंग्लंडला गेले. १८९१ मध्ये ते बॅरिस्टर झाल्यावर भारतात परत आले. काही दिवस त्यांनी मुंबई येथे वकिली केली. पण त्यात त्यांना विशेष यश आले नाही. १८९३ मध्ये ते आपल्या एका खटल्यासाठी दक्षिण आफ्रिकेला गेले. दक्षिण आफ्रिकेत असलेल्या भारतीयांवर काळा, गोऱ्या रंगाच्या कारणावरून अत्याचार होत होते. ते दूर करण्यासाठी त्यांनी इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना केली.भारतीयांवर होणाऱ्या अत्याचारांचा त्यांनी सतत प्रतिकार केला. आफ्रिकेत ते १९१४ पर्यंत राहिले होते. तेथे अनेक वेळा त्यांना कारावास भोगावा लागला. सत्य, अहिंसा या आपल्या शस्त्रांचा प्रयोग प्रथम त्यांनी तेथेच केला. भारतात १९१४ मध्ये महात्मा गांधीजी परत आले. त्यांच्या कार्यावरूनच भारतीय जनतेने त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. भारतात त्यांनी समाज सुधारण्याचे, लोक जागृतीचे काम सुरू केले. १९१९ पासून गांधीजी खऱ्या अर्थाने राजकारणात शिरले. बिहार मधील शेतकऱ्यांवर होणारा जुलूम त्यांनी दूर केला. १९१९ मधील रौलेट ॲक्ट विरुद्ध चळवळ, त्यातील हिंसाचारामुळे गांधींनी बंद केली. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. आणि काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. अन्यायाविरुद्ध लढण्याचे एक नवीन शस्त्र त्यांनी जनतेला दिले. सत्य, अहिंसा आणि असहकार यांचे धोरण त्यांनी स्वीकारले. देशाच्या स्वातंत्र्याला पोषक वातावरण त्यांनीच निर्माण केले. अनेक प्रकारची आंदोलने करून त्यांनी सरकारला मेटाकोटीस आणले.कायदेभंग, विदेशी वस्तूंवर बहिष्कार आणि मिठाचा सत्याग्रह ह्या आंदोलनांनी जनतेत तीव्र जागृती निर्माण केली होती. 'हरिजन'हे वर्तमानपत्र त्यांनीच चालू केले होते. हिंदू व मुसलमानातील दंगे थांबवण्यासाठी त्यांनी २१ दिवसांचे उपोषण केले. सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळी भारतीय जनतेने त्यांना फार चांगली साथ दिली. दांडीयात्रा गोलमेज परिषद ह्या देखील त्यांच्या जीवनात महत्त्वाच्या घटना मानता येतील. १९४२ मध्ये त्यांनी भारत छोडो आंदोलन सुरू केले. गांधीजींना असलेल्या जनतेच्या पाठिंबावरून होणाऱ्या विद्रोहाची कल्पना इंग्रजांना आली होती. त्यांनी गांधीजींना कारागृहात ठेवले. तरीही जनता त्यांच्याच आदेशाला मानत होती. १९४६ मध्ये गांधीजींना मुक्त करण्यात आले. १९४६ मध्ये कॅबिनेट योजना राबविण्यात आली. मुसलमानांच्या हेखेखोर स्वभावाने देशाचे तुकडे झाले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. ३० जानेवारी १९४८ रोजी सायंकाळी पाच वाजता ते प्रार्थनेला जात असताना नथुराम गोडसे नावाच्या इसमाने त्यांना गोळी घालून त्यांचा खून केला. महात्मा गांधींचा त्यामध्ये मृत्यू झाला. पण त्यांच्या विचारांनी त्यांना अमर केले. त्यांनी जगाला मानवता धर्म शिकविला. फ्रान्समधील लियान ब्लॉगच्या मते "मी गांधीजींना कधी पाहिले नाही, त्यांची भाषा मला अवगत नाही, आणि त्यांच्या देशात मी कधी पाय देखील ठेवला नाही. तरी पण त्यांच्या मृत्यूने अगदी जवळच्या मित्राचा मृत्यू झाल्यासारखे मला दुःख होत आहे." तर हेली फॅक्सच्या मते "संपूर्ण इतिहासात अशा व्यक्ती फारच कमी आढळतात. की ज्या आपल्या चारित्र्याने व दृष्टांताने पुढल्या पिढीवर इतका खोलवर परिणाम करतात."

महात्मा गांधीजींनी त्यांच्या जीवनात अनेक ग्रंथरचना केली. त्यामध्ये महात्मा गांधीजींनी प्रामुख्याने आपले विचार 'यंग इंडिया' व 'हरिजन' ह्या वर्तमानपत्रातून व्यक्त केले आहेत.त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन होता. चिंतन व कर्म यांचा योग्य समन्वय त्यांनी साधला होता. त्यांचे ग्रंथ पुढील प्रमाणे आहेत.१. हिंद स्वराज्य २. गीताबोध ३. आत्मकथा

४. माझे समकालीन पाच सूर्योदय ५. मंगल प्रभात ६. ब्रह्मचर्य ७. राष्ट्रवादी ८. ग्रामसेवा ९. खादी १०. आत्मशुद्धी ११. गीताई १२. धर्मनिती १३. धर्म नीती धर्म १४. आरोग्याची गुरुकिल्ली १५. आश्रम वासियांकडून १६. सत्यविराची कथा १७. राम नामाचे महत्व १८. सत्याग्रह १९. अनासक्त योग या ग्रंथांची रचना महात्मा गांधीजींनी केली.

**महात्मा गांधीजींची विचार प्रणाली**

सत्य हा महात्मा गांधीजींच्या विचारांचा पाया होता. व्यक्ती व समाजाला ते नैतिक बनू इच्छित होते. त्यासाठी त्यांनी सत्य आणि अहिंसा ही दोन तत्वे महत्त्वाची मानली. सत्य व अहिंसा एक दुसऱ्याला पूरक आहेत. या दोन्ही गोष्टी अविभाज्य आहेत. सत्या शिवाय कोणतेही तत्व पूर्णत्वास जात नाही. सत्याचे त्यांनी दोन प्रकार पडले आहेत. निरपेक्ष सत्य व सापेक्ष सत्य निरपेक्ष सत्य व सापेक्ष शक्तीच्या साह्याने व्यक्ती निरपेक्ष सत्याकडे जाते.निरपेक्ष सत्य हे शाश्वत असते. निरपेक्ष सत्य म्हणजे सत, चीत व आनंद यांचा सुंदर मिलाफ आहे. निरपेक्ष सत्य म्हणजे 'ईश्वर' आहे. निरपेक्ष सत्य श्रेष्ठ आहे. सापेक्ष सत्तेच्या बाबतीत होणाऱ्या चुका लक्षात घेऊन निरपेक्ष सत्याकडे जाणारा मार्ग मोकळा होतो. सत्याचे पालन कोणत्याही परिस्थितीत कोणतीही किंमत देऊन केले पाहिजे. सत्याचा अर्थ सर्वांवर प्रेम सेवा प्राप्त करणे होय. सर्वांचे प्रेम सर्वोच्च आत्मबलिदान सर्वोच्च दया आहे. सत्याची पूर्ती अहिंसेनेच शक्य आहे. विश्वासघात द्वेष ह्यांमुळे निरपेक्ष सत्याकडे जाता येत नाही. येशू ख्रिस्त, सॉक्रेटिस यांनी सत्यासाठी स्वतःचा जीव घालवला. धैर्य, विवेक, आत्मविश्वास आणि त्याग या सर्व गोष्टी सत्याच्या प्राप्तीसाठी आवश्यक आहेत. सत्य म्हणजे अंतरात्म्याची शक्ती आहे. महात्मा गांधीजींनी अहिंसेपेक्षा सत्तेवर जोर दिला.

सापेक्ष सत्य म्हणजे 'व्यक्ति किंवा परिस्थितीनुसार सत्याची कल्पना बदलत असल्यास त्याला सापेक्ष सत्य म्हणावे.' त्यापेक्षा सत्याला पूर्ण सत्य म्हणता येत नाही.

**अहिंसा**

सत्य व अहिंसा एक दुसरीला पूरक असणाऱ्या गोष्टी आहेत. सत्य इतकेच गांधीजींनी अहिंसेला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. अहिंसा आणि सत्य या दोन्ही आत्म्याचे गुण आहेत.त्यांच्या मार्गानेच सत्याप्रत पोहोचता येते. या दोन आत्म्याच्या शक्ती आहेत. इतरांना शारीरिक क्लेश पोहोचवणे किंवा रक्तपात करणे म्हणजे अहिंसा. इतका मर्यादित अर्थ गांधीजींना अभिप्रेत नव्हता. तर दुसऱ्याचे मन दुखवणे म्हणजे देखील ते हिंसा समजत होते. महात्मा गांधीजीची अहिंसा निरपेक्ष आणि विधेयक स्वरूपाची होती.

विधायक अहिंसा केवळ दुसऱ्याला त्रास न देणे, त्रास न होणे, म्हणजे खऱ्या अर्थाने दुसऱ्यांवर प्रेम करून त्यांच्या सुखासाठी झगडणे हीच खरी सेवा आहे.मुलांना ,दुर्बलांना किंवा स्त्रियांना कुणी त्रास देत असतील, त्यांच्यावर अत्याचार होत असतील आणि त्यांचा अपमान होत असेल तर अशा वेळेस त्यांच्या मदतीला धावून न जाणे म्हणजे एक प्रकारे हिंसेला मदत करणेच आहे. असे गांधीजींचे मत होते. निषेध हा आपल्या कार्याद्वारे शब्दद्वारे इतरांना कष्ट पोहोचवू नयेत यालाच गांधीजी निषेध धर्मक अहिंसा म्हणतात. तिरस्कार, स्वार्थ व दुष्टपणा त्यामुळे कोणालाही दुःख न देणे. तसेच

कोणाची हत्या न करणे, म्हणजेच विरोधात्मक अहिंसा होय. निरपेक्ष अहिंसा अत्यंत महान व्यक्तीची अहिंसा आहे. धर्माचे पूर्णपणे पालन करणे म्हणजे निरपेक्ष अहिंसा होय. महात्मा गांधीजींनी तीन प्रकारची अहिंसा सांगितलेली आहे. दुर्बल, वीर पुरुषांची, व भित्र्या व्यक्तीची अहिंसा होय. सत्याग्रह म्हणजे गांधीजींनी जगाला दिलेली फार मोठी देणगी आहे. सत्याग्रहाचे वास्तविक स्वरूप नैतिक आहे. गांधींच्या सर्व विचारात सत्याग्रहाला महत्त्वाचे स्थान आहे.हीच आत्म संघर्षाचे ते सर्वात मोठे साधन आहे. सत्याग्रह शब्दाचा अर्थ सत्याचा आग्रह असा होतो. सत्यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. साधनांचे सत्याग्रहाला वावडे आहे. सत्याग्रहाला त्यांनी म्हटले आहे. सत्याचा उपासक आत्मकथा सहन करून विरोधकाला चुकीच्या मार्गावरून योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करतो. तो देशाला प्रेमाने, असत्याला सत्याने, आणि अहिंसेला आत्महत्या द्वारे जिंकतो. अत्याचारी व्यक्तीची तो घृणा करीत नाही. तर अत्याचाराची घृणा करतो. सत्याग्रहाद्वारे तो दुसऱ्याचे हृदयपरिवर्तन करतो. गांधीजींच्या सत्याग्रहात अहिंसेला महत्त्वाचे स्थान आहे. सत्याग्रह म्हणजे प्रेम व सत्य यांचे मिलन आहे. प्रेम आणि अहिंसा ही सत्याग्रहाची अस्त्रे आहेत. धोका,द्वेष, क्रोध व सत्य यांना तिथे थारा नाही.

सत्याग्रहात प्रेमाची भावना आवश्यक असते.खऱ्या सत्याग्रही जवळ न मारता मरण्याचे धैर्य असते. नि:शस्त्र प्रतिकार विरोधकाला योग्य मार्गावर त्रास देऊन वश करण्याचा प्रयत्न करतो. तर सत्याग्रही प्रेम व सहनशक्तीचे प्रदर्शन करून विरोधकाला योग्य मार्गावर आणतो. महादेव देसाई यांच्या शब्दात "सत्याग्रह गतिशील असतो, तर निशस्त्र प्रतिकार हा स्थिर असतो. निशस्त्र प्रतिकार नकारात्मक रुपात कार्य करतो आणि अनिच्छेने दुःख सहन करतो."

सत्याग्रह म्हणजे अन्याय, शोषण आणि दडपशाही याविरुद्ध केलेला आत्मिक शक्तीचा वापर होय. सत्याग्रहाच्या मार्गाने विजय मिळतो. सत्याग्रह म्हणजे व्यक्तीचा पवित्र अधिकार आणि पवित्र कर्तव्य सुद्धा होय. तो देखील शेवटी विजय असतो. सत्याग्रहीचा मृत्यू झाल्यास तो देखील शेवटी त्याचा विजय ठरतो. तो मृत्यू पावल्यानंतर हजारो लोकांना त्याचे तत्वज्ञान पटते.ते त्यांने दाखविलेल्या मार्गाचा अवलंब करतात. येशू ख्रिस्ताच्या आत्मबलिदानाने लाखो लोकांना ख्रिश्चन धर्माची मते पटली आहेत.

सत्याग्रहाचा अवलंब करायचा असेल तर महात्मा गांधीजींनी पुढील पात्रता सांगितली आहे.आरोग्य उत्तम असावे, तो भित्रा नसावा, ध्येयनिष्ठ असावा, सत्याग्रह करणाऱ्याची परमेश्वराजवळ अढळ श्रद्धा असावी. ही श्रद्धा त्याला विरोधकांचा त्रास सहन करण्याची शक्ती देते. सत्याग्रहाला संपत्ती व प्रसिद्धीची हाव नसावी. द्वेष, क्रोध व घृणा यांच्या आहारी जाणारा तो नसावा. विरोधकांबद्दल त्याच्या मनात प्रेम, आदर असला पाहिजे. त्याने स्वतःच्या स्वार्थासाठी सत्याग्रहाचा मार्ग धरू नये. सत्याग्रहात गांधीजींनी शुद्ध आचरणावर अधिक भर दिला आहे. हिंसेला त्यात कुठेही स्थान नाही. गांधीजींनी सत्याग्रहाचा प्रयोग करताना वापरायची वेगवेगळी तंत्रे सांगितलेली आहेत. त्यामध्ये असहकार, उपोषण , हरताळ ,बहिष्कार ,सविनय कायदेभंग.

**महात्मा गांधीजींना त्यांच्या जीवनात लाभलेल्या प्रेरणा**

महात्मा गांधीजींवर पुढील अनेक ग्रंथांचा, लोकांचा प्रभाव पडला. त्यामध्ये रामायण, महाभारत आणि बौद्ध धर्मातील ग्रंथ यांचाही प्रभाव पडला होता. सर्वात जास्त 'गीता' या हिंदू धर्मातील ग्रंथाचा सर्वात अधिक प्रभाव पडला.'गीते 'ला ते आपला मार्गदर्शक मानत होते. संकट काळात 'गीते'नेच माझे मार्गदर्शन केले आहे. असे गांधीजींनी म्हटले आहे. 'New Testament' आणि 'सर्मन ऑन दि माउंटन 'ह्या ग्रंथाचाही प्रभाव त्यांच्यावर पडला होता. या पुस्तकांनी त्यांच्या विचाराला दृढता आणून दिली. गांधीजींच्या नैतिक व राजकीय विचारांवर जॉन रस्किन,डेव्हिड थूरो आणि टॉलस्टॉय यांचा प्रभाव पडला होता. रामचंद्रजी ह्या समाजसुधारक कवीचाही प्रभाव गांधीजींच्या नैतिक व धार्मिक जीवनावर झाला होता.

**महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार**

शिक्षण म्हणजे मनुष्याचा सर्वांगीण विकास होय. गांधीजींनी प्रारंभिक शिक्षणाला महत्त्व दिले. अहिंसात्मक तत्वाला शिक्षणात विशेष स्थान देणे गरजेचे आहे. शिक्षणाचा संबंध जीवनाशी असावा. प्राथमिक शिक्षण राज्यात नि:शुल्क व अनिवार्य असावे. प्राथमिक शिक्षण वयाच्या सातव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत देण्यात यावे. गांधीजींची शिक्षण योजना बुनियादी शिक्षण योजना म्हणून प्रसिद्ध आहे. या पद्धतीत कृतीतून शिक्षण देण्यात येते. 'करा व शिका' हे तत्त्व ह्या पद्धतीत कृतीतून शिक्षण देण्यात येते.शिक्षण मातृभाषेतून दिले जाते. शिक्षण घेतल्यानंतर व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहून शकते. ह्या शिक्षणामुळे सुशिक्षित बेकरांची समस्या राहणार नाही. व्यक्तीला स्वावलंबी बनवणारे हे शिक्षण असायला हवे. असे त्यांचे मत होते.

**महात्मा गांधीजींचे राजकारण आणि धर्म विषयक विचार**

महात्मा गांधीजींच्या पूर्वी अनेक लोकांनी राजकारण आणि धर्माची फारकत करण्याचा प्रयत्न केला. जे लोक धर्माला राजकारणापासून वेगळे करतात. त्यांना धर्माचा अर्थच कळला नाही, असे गांधीजी म्हणतात.गांधीजी धर्माला राजकारणापासून वेगळे करू इच्छित नव्हते.तर धर्म हा राजकारणाचा पाया आहे, असे ते म्हणत. कर्तव्य व धर्म यांचा अर्थ ज्यांना कळत नाही, त्यांना देशभक्ती म्हणजे काय? हे ही कळू शकत नाही. गांधीजी म्हणतात, की मी जेव्हा राजकारणात भाग घेतो, तेव्हा एखाद्या सर्पाप्रमाणे ते आपल्याला लपेटते. त्यातून मुक्ती होऊ शकत नाही. म्हणून त्या सर्पाशी लढण्यासाठी त्याला धर्माची जोड दिली पाहिजे. 'यंग इंडिया' मध्ये गांधीजींनी असे म्हटले आहे की,' सार्वजनिक जीवनाचा आरंभ केल्यापासून मी जे काही केले व जे काही बोललो. त्यामागे धार्मिक चेतना होती. उद्देश होता. मनुष्याचे सारे जीवन आर्थिक, बौद्धिक,राजकीय सामाजिक, धर्माने प्रेरित झाले पाहिजे. गांधीजींच्या मते धर्म म्हणजे एखादा विशिष्ट धर्म नव्हे. त्यांचा धर्म म्हणजे जीवनाची एक पद्धती आहे. हृदयाचे ते पावित्र्य आहे. त्याची उपासना ,प्रेम व सत्याच्या आधारे केली जाते. महात्मा गांधीजी धर्माचा आधार घेत म्हणतात की,"एक वेळ मी हवा पाण्याशिवाय राहू शकेन, पण ईश्वरावरचा विश्वास उडाला, तर मी जगू शकणार नाही. ईश्वर ही अदृश्य शक्ती असून प्रेम व सत्याद्वारे ती

प्राप्त करता येते." सत्य व ईश्वर ही एकाच वस्तूची दोन नावे आहेत. अंत:करण सत्य,प्रेम, हेच ईश्वर आहेत. त्यांचा धर्म म्हणजे शुद्धतम सार आहे. राजकारण व धर्म हे दोन्ही अभिन्न आहेत. धर्म शिवाय राजकारण होऊ शकत नाही.धर्माशिवाय राजकारण म्हणजे मृत्यूचा सापळा आहे. गांधीजी सर्व धर्मच समान मानतात. सर्व धर्म एकाच ध्येयाकडे जाणार आहेत. सेवा करणे, प्रेम करणे आणि दुर्गुणांवर विजय मिळविणे हाच धर्म आहे. असे महात्मा गांधी सांगतात.

**महात्मा गांधीजींची 'ग्राम' राज्याची कल्पना**

देशाच्या उन्नतीसाठी गांधीजींनी ग्राम महत्वपूर्ण मानले आहे. प्रत्येक गाव स्वावलंबी राहील, सहकार्य हा त्याचा आधार राहील. गावातील लोक शांतीपूर्ण व गौरवशाली जीवन जगतील. प्रत्येक गावात पंचायत राहील.अहिंसात्मक समाजाची स्थापना गावातच करावी लागेल. ते शक्य आहे. गांधीजी राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरनाचे समर्थक होते. गावातील पंचायत तेथे प्रशासन पाहील. प्रत्येक व्यक्ती स्वतःवर नियंत्रण ठेवील. दुसऱ्याच्या मार्गात अडचण म्हणणार नाही. आपल्या सर्व आवश्यकतांची पूर्ती करण्याची साधने ग्रामपंचायती जवळ उपलब्ध राहतील. गांधींजींचा आदर्श समाज पिरॅमिडसारखा नव्हे, तर गोलाकार राहील. व्यक्ती त्याचा केंद्रबिंदू राहील.गावातील कायदेविषयक, न्यायविषयक, शासन विषयक सत्ता ग्रामपंचायतकडे राहील. समाजात समता राहील. व्यक्ती गावासाठी आणि गाव देशासाठी बलिदान करेल. वर्तमान व्यवस्थेतील शक्तीचे झालेले केंद्रीकरण गांधीजींना मान्य नव्हते. महात्मा गांधीजींना खेड्याबद्दल आदर होता. खेड्याचा विकास झाला तरच देश सुधरेल, देशाचा विकास होईल अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. म्हणून महात्मा गांधीजी खऱ्या अर्थाने ग्रामस्वराज्याचे जनक ठरतात असे संशोधकाला वाटते.

**सारांश**

महात्मा गांधीजींनी आपल्या तत्त्वज्ञानामध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विचारणा महत्त्व दिले. जीवनाला सुखी करण्यासाठी आवश्यक असलेल्या तत्त्वज्ञानाची मांडणी खऱ्या अर्थाने गांधीजींनी केली. नवीन विचारांचा संगम आपल्याला त्यांच्या विचारात दिसतो. सत्ताही बंदुकीच्या साह्याने मिळते, हा माओवादी विचार गांधीजींना अजिबात मान्य नव्हता. अहिंसेचे पुजारी असलेल्या महात्मा गांधींनी सनदशीर मार्गावर भर दिलेला दिसतो. म्हणून आजही त्यांचे विचार समाजामध्ये महत्त्वाचे मानले जातात.

**संदर्भ सूची**

१. देशपांडे श्रीकांत वी., भारतीय राजकीय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर.डिसेंबर २००१

२. कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. १९६८

३. राठी शुभांगी, भारतीय राजकीय विचार, अथर्व पब्लिकेशन, धुळे. प्रथम आवृत्ती २०१४